महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# 'मुंबईज डब्बावाला'चे प्रकाशन

18 Sep 2011, 2314 hrs IST

**SMS NEWS to 58888 for latest updates**

म . टा . खास प्रतिनिधी

मॅनेजमेंट गुरु म्हणून कॉर्पोरेट जगतात नव्हे तर सातासमुद्रापार किर्ती मिळवणाऱ्या मुंबईतल्या डबेवाल्यांचा जीवन प्रवास आता ' मुंबईज डब्बावाला ' या इंग्रजी पुस्तकाच्या स्वरूपात अमराठी वाचकांसमोर आला आहे . त्याशिवाय या पुस्तकाच्या ई - बुकचेही प्रकाशन झाल्याने जगभरातल्या मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना इंटरनेटच्या माध्यमातून मुंबईच्या डबेवाल्यांचा अभ्यास करता येणार आहे .

मुंबईतल्या डबेवाल्यांची नोव्हेंबर २००३मध्ये प्रिन्स चार्लने भेट घेतल्यानंतर या डबेवाल्यांना ग्लॅमर प्राप्त झाले . जगभरातल्या वर्तमानपत्रांनी मुंबईच्या डबेवाल्यांची दखल घेतली . केवळ खुणांच्या सहाय्याने डबे अचूक ठिकाणी पोहोचवण्याच्या डबेवाल्यांच्या मॅनेजमेंटची जगभरातल्या मॅनेजमेंट स्कूलने दखल घेतली . याच डबेवाल्यांचा इतिहास व डबे पोहोचवण्याचे कौशल्य शोभा बोंद्रे यांनी ' अन्नदाता ' पुस्तकाच्या रूपाने शब्दबद्ध केले . आता या पुस्तकाचे इंग्रजी भाषांतर करण्याची जबाबदारी प्रा . शलाका वाळिंबे यांनी उचलली . मुंबई मराठी पत्रकार संघात झालेल्या एका सोहळ्यात ' मुंबईज डब्बावाला ' या पुस्तकाचे व इंटरनेटवरील पुस्तकाच्या आवृत्तीचे ख्यातनाम अभिनेते शिवाजी साटम व डबेवाल्यांचे नेते गंगाराम तळेकर यांच्या हस्ते प्रकाशन झाले . यावेळी शोभा बोंद्रे , मुंबईतल्या नोकरदारांना घरगुती जेवणाचे डबे देणाऱ्या डॉ . विजया वेंकट आदी उपस्थित होत्या .